divyamarathi.com

# भारती विद्यापीठातील २५ विद्यार्थ्यांना प्लेसमेंट

प्रतिनिधी | सोलापूर

भारती विद्यापीठ अभिजित कदम व्यवस्थापन शाखेच्या प्लेसमेंट सेलमार्फत २५ विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये उत्तम संधी प्राप्त झाल्याची माहिती संचालक डॉ. एस. बी. सावंत यांनी दिली.

भारती विद्यापीठात स्वतंत्र प्लेसमेंट सेल असून, उत्तम शैक्षणिक दर्जा व प्लेसमेंट यासाठी भारती विद्यापीठाची सोलापूर शाखा अग्रेसर आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा घेतल्या जातात. याचे कामकाज प्रा. अविनाश ढवण सांभाळतात. यावर्षी १४ कंपन्यांनी प्लेसमेंट इंटरव्ह्यू घेऊन २५ विद्यार्थ्यांची निवड केली. कॅम्पसमध्ये आलेल्या कंपन्यांमध्ये ॲक्सिस बँक, व्हेंचुरा, डीएसएस वर्ल्ड, एनआयआयटी, आयबीपीएस, सुनील मंत्री, गती लॉजिस्टिक्स, इंडिया इंफोलाइन, व्हाइट कोड अशा अनेक नावाजलेल्या कंपन्यांचा समावेश होता. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेने गौरव केला. प्रा. डॉ. प्रिया इराबत्ती, प्रा. जानवाडकर यांचे यासाठी सहकार्य लाभले.



भारती विद्यापीठातील प्लेसमेंट सेलमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या संचालकांसह प्राध्यापकवर्ग.